महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gove.in

क्र.उशिसं/साफुपु/२०१४-१५/प्रशा-३, दिनांक -०१.०९..२०१४

# जाहीरात

सावित्रीबाई फुले पुरस्कार सन २०१४-१५ साठी व्यापक प्रसिध्दी व्हावी, या हेतूने शिक्षण संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या शासन निर्णय दिनांक-१५.१२.२०११ अन्वये ईच्छूकांचे प्रस्ताव दिनांक. ०५.१०.२०१४ पर्यत अंतिमतः मागविण्यात येत आहेत.

तरी ईच्छूकांनी शासन निर्णय पाहून आपले परिपूर्ण प्रस्ताव खालील प्रपत्रात माहिती भरुन त्यांच्या पूष्टयार्थ पुरावे म्हणून प्राप्त प्रशस्तीपत्रके, वर्तमान पत्रातील कात्रणे, पोलीस पडताळणी अहवालासह संचालक,उच्चशिक्षण, मध्यवर्ती इमारत, पहिला मजला , ससून हॉस्पिटल समोर ता- हवेली , जि-पुणे-४११००१ येथे व्यक्तिशः किंवा पोष्टाद्वारे ३ प्रतीत दिनांक-०५.१०.२०१४ पर्यत सादर करण्यात यावेत. प्रपत्राचा नमूना खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | नाव व पत्ता | जन्म तारीख | दूरध्वनी क्रमांक | शिक्षण | केलेल्या कार्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

दिनांक-०५.१०.२०१४ या तारखेनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**टिप- सावित्रीबई फुले पुरस्कार हि योजना फक्त सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांसाठीच आहे.**

२/९/२०१४

(डॉ.प्र.रा.गायकवाड )
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे – १

सावित्रीबाई ज्योतीराव फुले पुरस्कार-निकष -
कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र-साफुपु-२०११/(१४८/११)/समन्वय,
शिबीर कार्यालय, नागपूर-४४०००१.
दिनांक- १५ डिसेंबर, २०११.

प्रस्तावना :-

ज्ञानज्योती, क्रांतीजोत कै.सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांनी समाजातील तळागाळातील दलित, पीडीत शोषित व्यक्तिसाठी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या सक्रिय सहभागाने अमोल कार्य केलेले आहे. सावित्रीबाई फुले यांनी महिला व समाजातील वंचीत घटकातील व्यक्तींना गुलामगीरीतुन मुक्त करण्याकरीता, तसेच त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याकरीता शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे सुमारे २०० वर्षापुर्वी जाणले होते. हे कार्य तडीस नेण्याकरीता झालेला विरोध झुगारुन सावित्रीबाई फुलेंनी शाळेतील अध्यापनाचे परिपाठ चालू ठेवून आमूलाग्र बदल तत्कालीन समाजामध्ये घडवून आणले. सावित्रीबाई फुले हयांनी तत्कालीन समाजामध्ये शैक्षणिक विचार आणि आधुनिकतेचे विचार दूरदृष्टी ठेवून रुजविले.

हया महान कर्मयोगी, ज्ञान योगी सावित्रीबाई यांच्या १५० व्या जयंतीचा ३ जानेवारी, १९८१ चा स्वर्णयोग साधून त्यांच्या नावाने प्रत्येक वर्षी, अशा महान कर्मयोगी महिलांना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. ज्यांनी सावित्रीबाई फुलेंचे कार्य नेटाने पुढे नेण्याकरीता प्राप्त प्रतिकुल परिस्थितीत सुध्दा समाजातील पददलित, परितक्त्या महिलांच्या उन्नतीसाठी आणि समाजाच्या विकासाठी भरीव कार्य केलेले आहे अशा महिलांचा यथोचित सन्मान व्हावा म्हणून सन १९८१ पासून आजतागायत प्रत्येक वर्षी हा पुरस्कार त्या-त्या क्षेत्रात उल्लेखनिय समाजकार्य केलेल्या महिलांना प्रदान केला जात आहे.

समाजामध्ये आजही अशा महान कर्मयोगी महिला कार्यरत आहेत की, ज्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासाठी, प्राप्त प्रतिकुल परिस्थितीत सुध्दा महान कार्य केलेले आहे. त्यांचे विचार त्यांचे आचार आणि त्यांच्या कार्याचा गौरव समाजातील सर्वसामान्य जनते पर्यंत पोचविण्यासाठी हया पुरस्काराला व्यापक स्वरुप देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सबब शासन, सदर

… आनुषंगाने यापूर्वी निर्गमित झालेले सर्व आदेश अधिक्रमीत करुन पुरस्काराची कार्यपध्दतीची रुपरेषा निश्चित करुन त्याच्या अंमलबजावणी बाबत खालील प्रमाणे आदेश देत आहेत

शासन निर्णय :-

सावित्रीबाई फुले पुरस्काराकरीता महिलांची निवड करण्याकरीता ठरविण्यात आलेले निकष, पुरस्काराची कार्यपध्दती, प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी समिती, निवड समिती, जाहिरात प्रक्रिया व सावित्रीबाई फुले पुरस्कार निवडीच्या प्रक्रियेचे टप्पे हया शासन निर्णायात अंर्तभूत करण्यात आलेले आहेत.

(अ) <u>या पुरस्कारासाठी खालील प्रमाणे निकष असतील</u> :-

(१) पुरस्कारासाठी अर्ज करणारी महिला ही शिक्षिका म्हणून कार्यरत नसावी.

(२) सदरहू महिलेने आपल्या प्रस्तावा सोबत पोलिस पळताडणी अहवाल जोडणे आवश्यक आहे.

(३) सदरहू महिलेचे वय ५० वर्ष पुर्ण असावे.

(४) महिला सबलीकरण, स्त्री शिक्षण, पददलितांचे शिक्षण, महिलांसाठी सामाजिक परिवर्तानाचे कार्य, स्त्रीभ्रुणहत्या प्रतिबंधात्मक कार्य, पल्स पोलियो मोहिमेचे कार्य, दलित-आदिवासी, विमुक्त भटक्या जाती जमाती गलीच्छ वस्ती सुधारणा, वंचित क्षेत्रातील महिलांकरीता केलेले कार्य. अपंग व्यक्तिंच्या पुनर्वसनासाठी व नैसर्गिक आपतिग्रस्तासाठी केलेले कार्य, महिला व बाल हक्क याचेसाठी केलेले कार्य तसेच अत्याचारीत महिलांना मोफत कायदेविषय सल्ला देण्याचे कार्य, व मोफत वैद्यकीय उपचार व सल्ला देण्याचे कार्य त्यांच्यासाठी मोफत आरोग्य शिबीरे आयोजित करण्याचे कार्य, बचत गटाची स्थापना करणे, महिलांसाठी स्वंरोजगार, कुटीर उद्योग सुरू करून देण्याचे कार्य तसेच वृध्द व निराधार महिलांसाठी वृध्दाश्रम स्थापन करण्याचे कार्य, अनाथ बालकांसाठी अनाथालये स्थापन करणे, महिलांना सहकार क्षेत्रातुन उद्योगाकरीता प्रोत्साहीत करणे, वेश्याव्यवसाय क्षेत्रातील महिलांचे पुनर्वसन करणे व आरोग्य सेवा उपलब्ध करणे, कौटुंबिक अत्याचार ग्रस्त महिलांना समुपदेशन करणे इ. क्षेत्रात केलेले भरीव कार्य.

पारितोषिकाचे स्वरूप – सावित्रीबाई फुले पारितोषिक प्राप्त महिलेस, रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) आणि प्रशस्तिपत्र देण्यात येईल. त्याकरिता प्रत्येक महसुली विभागातुन एक ह्या प्रमाणे राज्यातुन सहा महिलांची निवड करण्यात येईल.

(क) <u>या पुरस्कारासाठी निश्चित केलेली कार्यपध्दती :-</u>

(एक) संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे सदर पुरस्कार निवडीसाठी संचालनालयातर्फे महाराष्ट्र राज्यातील वर्तमानपत्रात जाहिरात देवून यास प्रसिध्दी देतील व आवश्यकता वाटल्यास उपलब्ध इतर प्रसिध्दी माध्यमांर्फत व्यापक प्रसिध्दी देखील करण्यात येईल.

(दोन) सदर पुरस्कार इच्छुक महिलांनी आपले प्रस्ताव खाली दर्शविलेल्या प्रपत्रानुसार तयार करुन त्यांनी केलेल्या कार्याचे पुरावे, प्रशस्तिपत्रके, वर्तमानपत्रातील कात्रणे इ. पुरावे जोडून ३ प्रतीत संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-१ येथे सादर करावेत. या संबंधिचे प्रपत्र खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | संपूर्ण नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक | जन्म तारीख व वय | शिक्षण | शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती | कार्याचा पृष्ठार्थी जोडलेले पुरावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

(ड). सदर प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी खालील प्रमाणे **छाननी समिती** गठीत करण्यात येत आहे.

(१) संचालक उच्च शिक्षण पुणे. - अध्यक्ष
(२) शासनाचे प्रतिनिधी. - सदस्य
(३) सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य केलेली महिला. - सदस्य
(४) सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त केलेली महिला.- सदस्य
(५) सहसंचालक, उच्च शिक्षण पुणे . - सदस्य सचिव

(इ). छाननी समिती मार्फत तपासून परिपूर्ण प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनाच्या निवड समिती कडे सादर करण्यात येतील. शासन निवड **समिती** खालील प्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

FROM :KCNGP FAX NO. :07122554210+91 712 2 Dec. 15 2011 06:49PM

(एक) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(दोन) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - अध्यक्ष

(तीन) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - उपाध्यक्ष

(चार) सहसचिव/उपसचिव/अवरसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - सदस्य

(पाच) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - सदस्य सचिव

- सदस्य

(क्ष) निवड प्रक्रियेचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील. :-

| | | |
|---|---|---|
| १. | पुरस्कार इच्छुक महिलांकडून अर्ज मागविण्यासाठी जाहिरात देणे. | १ सप्टेंबर पर्यंत. |
| २. | अर्ज सादर करण्याची मुदत | - १ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर पर्यंत. |
| ३. | छाननी समितीमार्फत या प्रस्तावांची छाननी | - १५ ऑक्टोबर पर्यंत. |
| ४. | छाननी झालेल्या प्रस्तावांची शासनाकडे शिफारस करणे. | - २५ ऑक्टोबर पर्यंत. |
| ५. | निवड समितीची सभा आयोजित करणे | - १ ते १५ डिसेंबर पर्यंत. |
| ६. | मा.मंत्री महोदय यांचे कडून पुरस्काराची घोषणा | - दिनांक ३ जानेवारी रोजी. |
| ७. | मा.मंत्री महोदय यांचे अध्यक्षते खाली पुरस्कार वितरण सोहळा. | - दिनांक १० मार्च रोजी. |

सावित्रीबाई फुले पुरस्काराकरीता होणारा खर्च २२०५, कला व संस्कृती-८००-इतर खर्च (एक) (ए) समित्या व समांरभ-मगणी क्रमांक.डब्ल्यु-४ (२२०५०४५८) या लेखाशिर्षा खालील मंजूर तरतुदीतुन भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र-२०१११२१५०७२४०५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शैला तारगे पाटील)
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य.
३. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई(जाहीर प्रसिध्दीकरीता).
८. उपसचिव, मा.मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय मुंबई.
९. मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
१०. मा.राज्य मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
११. मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय मुंबई.
१२. सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय मुंबई.
१३. वित्त विभाग मंत्रालय मुंबई.
१४. सर्व उप सचिव, अवर सचिव, कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई.
१५. निवड नस्ती (समन्वय)

FAX NO. :07122554210+91 712 2 Dec. 15 2011 06:49PM P